

शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या मातोश्री नागरबाई यांनी कचरावेचक महिलांना जीवनावश्यक साहित्याची मदत करताना.

# कचरावेचक महिलांना जीवनावश्यक वस्तू

कोल्हापूर टाइम्स टीम

करोना विषाणू साथीच्या प्रादुर्भावामुळे हाताला मिळणारे काम बंद झाल्याने हलाखीत जीवन जगणाऱ्या कचरावेचक महिलांना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या आई नागरबाई यांनी मदतीचा हात दिला. श्रीमती शिंदे यांनी पतीच्या पेन्शनमधून साठवलेल्या पैशातून जीवनावश्यक वस्तूंचे कीट या महिलांना वाटप करत सामाजिक बांधिलकी जपली.

रोज सकाळी कचरा गोळा करून कुटुंबाचा गाडा चालवणाऱ्या कचरा वेचक महिलांना लॉकडाउनमुळे बाहेर पडता येत नाही. त्यामुळे त्यांची आर्थिक कमाई बंद आहे. त्या महिलांसाठी, नव्वद वर्षीय श्रीमती शिंदे यांनी त्यांच्या पेन्शनच्या रकमेतून मदत करण्याचा निर्णय घेतला. यानुसार 'अवनी' संस्थेअंतर्गत काम करणाऱ्या कचरावेचक महिलांना कामगार दिनाच्या औचित्याने सुरक्षित वावर नियमाचे पालन करून जीवनावश्यक साहित्य दिले. यावेळी अवनी संस्थेच्या उपाध्यक्ष अनुराधा भोसले, समन्वयक जैनुद्दीन पन्हाळकर, लक्ष्मी कांबळे, भारती कोळी, पिंकी चव्हाण, आक्काताई गवळी यांच्यासह कचरावेचक महिला उपस्थित होत्या.

# विद्यापीठातील अत्यावश्यक विभागातील काम सुरू

**कोल्हापूर :** करोना रूग्णांच्या संख्या निकषावर कोल्हापूर ऑरेंज झोनमध्ये समाविष्ट झाल्याने लॉकडाउनमध्ये काही सवलती मिळाल्या आहेत. मात्र राज्य सरकारच्या आदेशानुसार ऑरेंज झोन शहरातील शिक्षणसंस्था, विद्यापीठ बंद ठेवण्याच्या सूचना असल्यामुळे शिवाजी विद्यापीठात सोमवारपासून अत्यावश्यक विभागातील काम पूर्वीप्रमाणे सुरू ठेवण्यात आले आहे.

विद्यापीठातील सर्व अधिविभाग



पुढील आदेश येईपर्यंत बंदच ठेवण्यात येणार आहे. प्रशासकीय अधिकारी, जनसंपर्क अधिकारी, अभियांत्रिकी विभाग, सुरक्षा रक्षक व माळीकाम करणारे कर्मचारीच केवळ उपस्थित आहेत. विद्यापीठ इमारत व आवारातील पावसाळ्यापूर्वी नियोजित असलेली कामे सध्या सुरक्षित वावरचे नियम पाळून सुरू आहेत.

एकूण कर्मचाऱ्यांपैकी ३० टक्के कर्मचारी कामावर येत असून कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्यासह प्रकुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांच्यासह उपकुलसचिव कार्यालयात अत्यावश्यक कामासाठीच यावे, अशा सूचना प्रशासनाने दिल्या आहेत.

# विद्यापीठात पगार नियमित

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा एप्रिल महिन्याचा पगार पूर्णपणे त्यांच्या खात्यावर जमा करण्यात आला आहे, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली.

करोना विषाणू संसर्गाचा पार्श्वभूमीवर राज्य सरकारने विविध सरकारी व निमसरकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पगार कपातीबाबत श्रेणीनुसार सूचना केल्या होत्या. सरकारी व निमसरकारी कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे श्रेणीनुसार ५० ते ७५ टक्के वेतन कपात करावी, असे आदेश राज्य सरकारने दिले होते . हे आदेश मार्च महिन्यातील वेतन कपातीला लागू करण्यात आले होते. याअंतर्गत शिवाजी विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी यांच्या श्रेणीनुसार ५० ते ७५ टक्के पगार कपात करण्यात आला होता. ही पगार कपात मार्चच्या पगारात करण्यात आली होती. मात्र कपात केलेली रक्कम सरकारचा पुढील आदेश आल्यानंतर देण्यात येणार आहे. दरम्यान,एप्रिल महिन्याचे पूर्ण वेतन विद्यापीठातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना मिळाल्यामुळे आर्थिक दिलासा मिळाला आहे.

# विद्यापीठात २५ टक्के कर्मचाऱ्यांची उपस्थिती

कोल्हापूर : कोरोनाच्या पार्श्वभूमीवरील लॉकडाऊनमुळे सध्या शिवाजी विद्यापीठात २५ टक्के कर्मचारी कार्यरत आहेत. कामाच्या गरजेनुसार विविध विभागांमध्ये कर्मचाऱ्यांची उपस्थिती आहे. राज्य शासनाच्या सूचनेनुसार टप्प्या-टप्प्याने विद्यापीठातील कर्मचाऱ्यांची उपस्थिती वाढविण्यात आली आहे. वीज आणि पाणीपुरवठा, उद्यान, आदी अत्यावश्यक सेवांबरोबरच प्रशासन, वित्त, परीक्षा, आदी विभागांमध्ये कर्मचारी कार्यरत आहेत. त्यांची एकूण संख्या १२५ इतकी आहे. कर्मचाऱ्यांची उपस्थिती वाढविण्याबाबत कोणतीही सूचना प्राप्त झालेली नाही. शासनाच्या सूचनेनुसार त्याबाबत कार्यवाही करण्यात येईल, असे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी सोमवारी सांगितले.



# कुलगुरूंच्या मातोश्रींकडून कचरावेचक महिलांना मदत

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कोरोना विषाणू साथीच्या प्रादुर्भावामुळे हाताला मिळणारे काम बंद झाल्याने हालाखीत जीवन कंठणाऱ्या कचरावेचक महिलांना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या मातोश्री नागरबाई बाबूराव शिंदे यांनी मदतीचा हात दिला. शिंदे यांनी पतीच्या पेन्शनमधून साठवलेल्या पैशातून जीवनावश्यक वस्तूंचे किट या महिलांना वाटप करून वयाच्या ९० व्या वर्षी आपल्या सामाजिक बांधिलकीची प्रचिती दिली.

'अवनी' संस्थेंतर्गत काम करणाऱ्या कचरावेचक महिलांना मदत करण्याचे ठरले. त्यानुसार महाराष्ट्र दिनानिमित्त विद्यापीठ परिसरात सोशल डिस्टन्सिंगचे पालन करत मोजक्या लोकांच्या उपस्थितीत कचरावेचक महिलांना जीवनावश्यक वस्तूंच्या किट वितरित करण्यात आले.

यावेळी अनुराधा भोसले, जैनुद्दीन पन्हाळकर, लक्ष्मी कांबळे, भारती कोळी, पिंकी चव्हाण, आक्काताई गवळी यांच्यासह कचरावेचक महिला उपस्थित होत्या.

# शिवाजी विद्यापीठात २५ टक्के कर्मचारी

कोल्हापूर, ता. ४ : लॉकडाउन झोनप्रमाणे शिथिल करण्याचा निर्णय घेतला. यामध्ये कोणती कार्यालये सुरू राहणार आहेत व त्यात किती कर्मचारी असावेत हे देखील निर्देशित केले आहे. त्यानुसार आज शिवाजी विद्यापीठात २५ टक्के कर्मचारी उपस्थित होते. कोरोनाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी राज्यातील विद्यापीठे बंद आहेत; मात्र प्रशासकीय काम सुरू होते. २१ मार्चनंतर पूर्ण लॉकडाउन सुरू झाला. यावेळी शिवाजी विद्यापीठातील बहुतांशी कर्मचाऱ्यांनी घरातून काम केले. त्यानंतर आवश्यकतेनुसार कर्मचारी, अधिकारी येत होते. लॉकडाउन शिथिल केल्यानंतर २५ टक्के कर्मचारी उपस्थित आहेत. शासनाचा पुढील आदेश आल्यानंतर त्या प्रमाणे कार्यवाही केली जाईल, असे विद्यापीठ प्रशासनाने सांगितले.